बुधवार दि.२९ मे २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २७१
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

# दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

## 'तो' दुसरा मुलगा कुणाचा?:नाना पटोले यांचा खडा सवाल

# कारने दुचाकीला धडक दिली तेव्हा गाडीतून २ तरुण उतरल्याचा केला दावा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

पुण्याच्या कल्याणीनगरात पोर्शे कारने दुचाकीस्वार अभियंत्यांना उडवले तेव्हा कारमधून अल्पवयीन आरोपीसह अन्य एक तरुण उतरला होता. हा दुसरा तरुण कोण? असा डा सवाल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे. त्यांच्या या सवालामुळे हा दुसरा मुलगा एखाद्या मोठ्या नेत्याचा होता काय? अशी चर्चा सुरू झाली आहे.

नाना पटोले यांनी मंगळवारी मुंबईत पत्रकारांशी वार्तालाप केला. त्यात त्यांनी पुण्यातील हिट अँड रन प्रकरणावरून राज्य सरकारवर टीकेची झोड उठवली. तसेच या प्रकरणाच्या तपासावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले की, पुण्यात पोर्शे कारच्या धडकेत दोघांचा मृत्यू झाला. त्यावेळी कारमधून २ जण उतरले होते. तो दुसरा मुलगा कुणाचा होता? या प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे.ललित पाटील प्रकरणात ससून रुग्णालय ड्रग्ज माफियांचा अड्डा बनल्याचे उघड झाले. त्यानंतर आता याच रुग्णालयात अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुणे बदलण्याचा प्रकार घडला. नागपूरमध्येही अशीच एक घटना घडली. मद्याच्या अंमलाखाली २ मुलींनी दोघांना उडवल्या. पण नंतर त्या सुटल्या. जळगावमध्येही अशाच एका घटनेतील एक आरोपी अवघ्या १० तासांत सुटला. हे सर्वजण श्रीमंत कुटुंबातील होते. पुण्यातील डॉक्टर डॉक्टर तावरेंच्या प्रकरणात काही मंत्र्यांची नावे येण्याची शक्यता आहे. त्यामुळे यावर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस काय करणार? त्यांनी या प्रकरणी आपला राजीनामा दिला पाहिजे, असे नाना पटोले म्हणाले.काँग्रेस आमदार रवींद्र धंगेकर गत वर्षभरापासून पुण्यातील पब संस्कृतीविरोधात लढा देत आहेत. मग या घटनेनंतरच ३६ पबवर का कारवाई करण्यात आली? अजित पवार पुण्याचे पालकमंत्री आहेत. त्यांनी या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. हेच अजित पवारांचे कडक शासन? असा सवालही नाना पटोले यांनी यावेळी उपस्थित केला.नाना पटोले यांनी यावेळी मराठा - ओबीसी वाद संपण्याची गरजही व्यक्त केली. ते म्हणाले की, बीडमध्ये घडलेली घटना महाराष्ट्राची संस्कृती नाही. राज्य सरकारने त्याकडे दुर्लक्ष न करता त्याची गंभीर दखल घ्यावी. मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत याविषयी मला काय उत्तर दिले होते हे त्यांनी आठवावे.दरम्यान, पुणे हिट अँड रन प्रकरण सुरुवातीपासून वादात सापडले आहे. या प्रकरणी पोलिस व डॉक्टरांवर आरोपीच्या कुटुंबाला प्राधान्य देण्याचा आरोप आहे. विशेषतः यासंबंधी अल्पवयीन आरोपीच्या आजोबांचे अंडरवर्ल्ड कनेक्शनही समोर आले आहे. मद्यपान करून पोर्शे चालवणाऱ्या अल्पवयीन आरोपीला सुरुवातीला जामीन मंजूर करण्यात आला. पण जनक्षोभानंतर तो रद्द करण्यात आला. त्याला ५ जूनपर्यंत बालसुधारगृहात पाठवण्यात आले. त्यानंतर या प्रकरणी त्याचे वडील विशाल अग्रवाल व आजोबा सुरेंद्र अग्रवाल यांनाही अटक करण्यात आली. या दोघांवर पैशाच्या बळावर हे प्रकरण दाबण्यासाठी बेकायदा पाऊले उचलल्याचा आरोप आहे



# श्री तेजमल गांधी कृषी विद्यालय चा १० वीचा निकाल ९३.४५ %

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड | सय्यद रहीम रजा**



नुकताच काल दहावीचा निकाल दुपारी १ वाजता लागला असून श्री शिवाजी शिक्षण संस्था पुसद संचलित श्री तेजवल गांधी कृषी विद्यालयाचा निकाल ९३ . ४५ % लागला आहे . विद्यालयातून प्रथम क्रमांक माने वैष्णवि पंजाबराव -९४.६०% व्दितीय क्रंमाक रावते स्नेहल गजानन -९२.२०% तृतीय क्रमांक जाधव सलोणि विश्वनाथ -९१.८०% चतुर्भ क्रंमाक पतंगे गायत्री गजानन - ९१.२०% यांना मिळाला आहे . या विद्यालयातुन १६८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यामध्ये प्राविण्यसह ४३ विद्यार्थी आले असुन प्रथम श्रेणीत ६१ विद्यार्थी आले असुन ३९ विद्यार्थी दितीय श्रेणीत आले आहेत तर १४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक माजी आमदार विजयराव चोंढीकर, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील चोंढीकर सचिव अश्विनीताई चोंढीकर, चेअरमन डॉ . विजयराव माने, अँड अर्चनाताई माने, प्राचार्य पेन्टेवाड, समन्वयक सुधाकर वानखेडे तथा सर्व शिक्षक, शिक्षिका,शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले आहे.

# मतमोजणीसाठी नियुक्त पर्यवेक्षक व सहायकाना दिले प्रशिक्षण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली | सय्यद रहीम रजा**



हिंगोली लोकसभा मतदार संघाची मतमोजणी दि. ४ जून, २०२४ रोजी होत आहे. या मतमोजणीसाठी नियुक्त सूक्ष्म निरीक्षक, पर्यवेक्षक व त्यांच्या सहायकांनी त्यांना मतमोजणीची देण्यात आलेली जबाबदारी चोखपणे पार पाडून निवडणूक प्रक्रिया यशस्वी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी केले.

हिंगोली लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या अनुषंगाने सूक्ष्म निरीक्षक, पर्यवेक्षक व सहाय्यकांचे द्वितीय प्रशिक्षण आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर उपस्थितीत घेण्यात आली. यावेळी सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे, उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, समाधान घुटुकडे यांच्यासह हिंगोली लोकसभा मतदार संघातील सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते. यावेळी मतमोजणीसाठी नियुक्त पर्यवेक्षक, सहायक, सूक्ष्मनिरीक्षकाचे कार्य, जबाबदारी आणि कर्तव्याबाबत तसेच मतमोजणीसाठी करावयाच्या कामकाजाबाबत पीपीटीच्या साह्याने उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणास नियुक्त सूक्ष्म निरीक्षक, पर्यवेक्षक व त्यांचे सहायक उपस्थित होते.

# सभामंडप कोसळल्याने १२ जण जखमी; दोघे अत्यवस्थ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मलकापूर | अनिलकुमार गोठी**

वादळी वाऱ्यामुळे शहरातील समर्पण लॉन येथील सभामंडपाचे छत उडाल्याने भिंत कोसळली. यामुळे स्वयंपाक करणाऱ्या १२ मजूर महिला व पुरुष जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या दुर्घटनेत दोन जण गंभीर जखमी झाल्याने त्यांना जळगाव येथे हलवण्यात आले.

या दरम्यान प्रशासकीय यंत्रणेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मदतीसाठी यंत्रणासज्ज केली असल्याची माहिती आहे.त्यामध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी देवराम गवळी, पोलीस निरीक्षक अनिल गोपाळ, महसूल विभाग, संतोष शिंदे, तहसीलदार राहुल तायडे, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिन तायडे, नगर पालिकेचे मुख्याधिकारी आशिष बोबडे, महावितरणचे रत्नदीप तायडे यांनी कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने परिस्थिती हाताळली.



# लिंबागणेशचे माजी उपसरपंच अशोक जाधव यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोडे**



तालुक्यातील लिंबागणेश येथील माजी सरपंच अशोक सुंदरराव जाधव ( वय ४४ वर्षे) यांचे आज दि.२८ मंगळवार रोजी सकाळी साडे दहा वाजता बीड जिल्हा शासकीय रुग्णालयात निधन झाले. सन २०१२ ते २०१७ दरम्यान लिंबागणेश गावचे उपसरपंच असलेले अशोक जाधव गेल्या २ वर्षांपासून आजारी होते. गुरुवार रोजी अत्यवस्थ वाटु लागल्याने त्यांना बीड जिल्हा रुग्णालयात अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले होते. आज सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. सायंकाळी ४ वाजता त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी मोठ्या प्रमाणात पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.त्यांच्या पश्चात पत्नी बेबी,मुलगा शुभम,मुलगी सानिया,भाऊ महावीर,आई शिलावती,वडिल सुंदरराव जाधव असा परीवार आहे.

# मोहम्मद मकरानी ने एस.एस.सी.इंग्रजी माध्यमाने झालेल्या परीक्षेत यश प्राप्त




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा | प्रतिनिधी**

२०२४ मध्ये झालेल्या एस.एस.सी. परीक्षेत मोहम्मद मकराणी यांन ८५ टक्के गुण मिळवून प्रथम श्रेणीत विशेष प्राविण्यासह घवघवीत यश संपादन केले आहे. मोहम्मद मकराणी हा दैनिक पार्श्वभूमी या वृत्तपत्राचे पाटोदा तालुका प्रतिनिधी पत्रकार अ.कादर मकराणी यांचा मुलगा आहे. पाटोदा येथील लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूल या शाळेमार्फत सन-२०२४ मध्ये झालेल्या एस.एस.सी.परीक्षेत एकूण २२ विद्यार्थी प्राविण्यसह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत. या शाळेचे प्राचार्य व शिक्षक वृंद यांच्या अथक मेहनतीमुळे या शाळेची शंभर टक्के निकालाची परंपरा ही गेल्या बारा वर्षापासून चालू आहे.


मोहम्मद मकराणी यांने या शाळेतून शिक्षण घेतले आहे, एस.एस.सी.बोर्डाच्या झालेल्या परीक्षेत मोहम्मद मकराणी यांना ८५ टक्के गुण मिळाले आहे. मोहम्मद मकराणी याचे या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

# नगर पालिका प्रशासनाने रस्ते केले मोकळे अवघ्या बारा तासात

**मलकापुरात झाला होता चक्काजाम**

अचानक आलेल्या वारा उधाणामुळे व पावसामुळे मलकापुरातील अनेक ठिकाणचे झाडे जमीनदोस्त झाली त्यामुळे रहदारीसाठी अडथळा निर्माण झाला होता. रहदारी सुरळीत करण्यासाठी युद्ध पातळीवर माझी टीम कामाला लागली आणि अवघ्या बारा तासात जेसीपी लावून रहदारी मोकळी केली

**न प मुख्याधिकारी डॉक्टर आशिष बोबडे मलकापूर**




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मलकापूर | अनिलकुमार गोठी**

मलकापूर मध्ये अवकाळी पावसामुळे व वादळी वाऱ्यामुळे मलकापूर मधील मुख्य रस्त्यावरील झाडे उलमडून पडली होती एका तास भर पावसाने मलकापूर तालुक्यात थैमान घातले होते त्या वेळी नगर परिषद मलकापूर मुख्याधिकारी डॉ बोबडे यांनी व याच्या चमू नी परस्थिती आलोक्यात आणली अवघ्या १२तासातच मुख्य रस्ते वाहतूक सुरू केली.दिनांक २७ मे रोजी सायंकाळी मलकापूर तालुक्यामध्ये वादळी वाऱ्याचा विजेच्या कडकडाटाने मलकापूर तालुका हादरले होते पावसाने थैमान घातले होते मलकापूर तालुक्यातील वाघुळ गावापासून सर्विस रोडवर झाडे कोसळून पडली होती मलकापूरच्या आत येण्याचे सर्व दोन्ही बाजूने रस्ते बंद होते मलकापूर तालुक्यातील दाताळा टोलबुत वरील तीन पत्रे चेंडू सारखे उडून गेली तर मलकापूर शहरांमध्ये येण्यासाठी रस्त्यावरील बरीच मोठी झाडे तुटून पडली होती तर मलकापूर शहरांमध्ये मुख्य रोडवर वाहतूक ठप्प झाली होती मदत कार्य कसे करावे व कुठून करावे हे सूचेणा असे झाले होते परंतु मलकापूर नगरपालिका मुख्याधिकारी डॉ आशिष बोबडे यांनी व याच्या चमू नी भर पावसामध्येच युद्ध पातळीवर काम सुरू केली तर अवघ्या बारा तासातच मलकापूर शहरातील मुख्य रस्त्यावरील कोसळून ४० पडलेली झाडे रस्त्यावरून हटवून रस्ता मोकळा केला त्यामुळे मलकापूर शहराच्या नागरिकाकडून नगरपालिका मुख्याधिकारी व त्यांच्या चमुचे आभार मानले आहे.

# ग्रामीण भागात पाणी टंचाईच्या तिव्र झळा; जिल्हा प्रशासन वातानुकूलित कार्यालयात पाणीटंचाई आढावा बैठका घेऊन निर्धास्त-डॉ.गणेश ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

बीड जिल्ह्यात मागच्या पावसाळ्यात समाधान कारक पाऊस झाला नसल्याने ग्रामीण भागातील लोकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.एप्रिल व मे महिन्यात पडलेल्या तिव्र उन्हामुळे जिल्ह्यातील जवळपास सर्वच धरणांनी तळ गाठला आहे.१४३ धरणांमध्ये केवळ ४ टक्केच पाणीसाठा शिल्लक आहे.जिल्ह्यातील लघु ,मध्यम प्रकल्प कोरडे पडल्याने जमिनीतील पाणी पातळी घटल्याने विहिरी, बोअरवेल कोरड्याठाक पडल्याने पाणी पातळी खालावल्याने अनेक गाव वाड्या तांड्यावर तिव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. उन्हाळा सुरू झाल्यानंतर ग्रामीण भागात दरवर्षी पाणीटंचाई सुरू होते.ग्रामीण भागातील महिलांना पहाटेपासूनच पाण्याच्या शोधार्थ पायपीट करावी लागते.त्यात महिला आणि लहान बालके यांच्या डोक्यावर हंडे, घागरी,सायकलला अडकवलेली केंड, घागरी व इतर माध्यमातून पाणी मिळवण्यासाठी त्यांची धावपळ दिसुन येते.अलीकडे पुरुष मंडळी घरातील महिलांसोबत पाणी भरण्याच्या मदतीसाठी





येत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे.जिल्हा प्रशासनाचे प्रयत्न मात्र तोकडे पडताना दिसत असुन जिल्हा प्रशासन पाणीटंचाईचा आराखडा वातानुकूलित रुम मध्ये बसुन प्रसारमाध्यमांतुन पाणीटंचाई वर मात करण्यासाठी आवाहन करत निर्धास्त असल्याचे दिसून येत आहे.बीड तालुक्यातील पोखरी (घाट) येथील २०० लोकसंख्या असलेली भोसले नामक दलित वस्ती.सार्वजनिक विहीरीत भायाळा साठवण तलावातुन आठवड्याला पाणी सोडले जाते.७ परस विहीरीतील पाणी शेंदुन सांडपाण्यासाठी वापरावं लागते. पिण्याच्या पाण्याची अवस्था बिकट आहे. संपूर्ण वस्तीला सध्या एकाच हातपंपाचा आधार असुन अधुन मधुन १०-२० हंडे पाणी येते त्यामुळे लहानमुले आपला नंबर येण्याची वाट बघत असतात.संपुर्ण वस्तीला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत नसल्याने बोअरवेल द्यावा अशी ग्रामस्थांची मागणी आहे.संबधित प्रकरणी सरपंच मुळीक यांच्याशी संपर्क साधला असता पंचायत समितीकडे बोअरवेल आणि टँकरचा प्रस्ताव मार्चमध्येच पाठवला असुन अजुन प्रशासनाकडून सकारात्मक निर्णय येण्याची वाट पहात असल्याचे सरपंच बिभीषण मुळीक यांनी सांगितले.बीड जिल्हा प्रशासनाने वातानुकूलित कार्यालयात पाणीटंचाई आराखडा आखताना पाणीटंचाईच्या अनुषंगाने टँकर मंजुरीबाबत काही अडचणी असल्यास संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांना तसेच पाणीटंचाई विषयी काही तक्रार असेल तर जिल्हा परीषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याशी संपर्क साधला असे आवाहन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ यांनी केलेले आहे. मात्र संबंधित प्रकरणात आधिका-यांशी संवाद साधल्यानंतर फक्त आश्वासनच पदरी पडताना दिसत आहे.केंद्र सरकार पुरस्कृत जलजीवन मिशन अंतर्गत प्रति व्यक्ती ५५ लिटर पाणी देण्याची घोषणा हवेतच विरल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागातील बहुतांश जलशुद्धीकरण केंद्रे धुळखात पडुन असुन अशुद्ध पाण्यामुळे अतिसार ,काविळ,विषमज्वर आदि जलजन्य आजार पसरत असतानाच विहिरीतल्या आणि बोअरच्या पाण्यात जास्त प्रमाणात क्षार आढळतात. खरडुन पाणी उपसा करत असल्याने जंतुसंसर्गाचा धोका अधिक असतो.ग्रामिण भागातील बहुसंख्य महिलांच्या शरीरात रक्त कमी असल्याने निमिया आजाराची थकवा येणे, चालताना दम लागणे आदी तक्रारी असतात. मुळातच शरीरात कॅल्शियमचे प्रमाण कमी असल्याने विहिरीतुन पाणी शेंदल्याने तसेच डोक्यावरुन पाणी वाहुन आणण्यामुळे मणक्यांच्या आजारांचे आढळून येतात.

# माणुसकीचा धर्म सोडून स्वत:च्या व्यवसायासाठी आरो कॅन धारकांन कडून ६० रुपय ते ८० रुपयांनी कॅनची विक्री

## मलकापूरात माणुसकीला काळिमा फासणारा प्रकार;लाखो रुपये ७२तासात आरो चे पिंन्याचे पाणी विकून कमविली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मलकापूर । अनिलकुमार गोठी**

अचानक आलेल्या वादळी वाऱ्याने मलकापूर शहरासह तालुक्याला झोपडपले आहे. या वादळी वाऱ्याने शहरातील अनेक झाडे तुटून पडली आहे तर उभे विद्युत पोल सुद्धा अक्षरशा जमिनीपर्यंत झोपले आहे. यामुळे मलकापूर शहरात ७२ तासापासून विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. विद्युत पुरवठा ठप्प झाल्याने पंचायत पंचेचाळीस डिग्री तापमान असून



जीवाची लाहीलाही होत आहे. अश्यातच विद्युत पुरवठा नसल्याने आरो प्लांट धारक मनुष्य धर्म सोडून स्वतःच्या हिताचा विचार करून हीच वेळ खरी लुटण्याची म्हणून बरेच आरो प्लांट चे मालक एका आरो कॅन किंमत ७० रुपये प्रमाणे विकून नागरिकांची लूट करताना दिसून येत आहे अशावेळी धनदांडगे आरो कॅन घेऊ शकतात पण गरिबांचा काय काही विचार करणे गरजेचे होते .

### आरो प्लॅन मालक

गेल्या ७२तासांपासून विद्युत पुरवठा खंडित असल्याने आरोप आणि चे उत्पादन करण्यास असमर्थ आहोत शिवाय प्रमाणापेक्षा जास्त मागणी वाढल्याने आजूबाजूच्या शहरात जाऊन पाणी खरेदी करून आणून विकणे हा व्यवसाय चालवत आहोत त्यामुळे लोकांच्या गरजा पाहता अधिक खर्च करून मेहनतीचा नफा जोडून नियमित किमतीपेक्षा जास्त दराने विकणे काळाची गरज ठरली आहे.

# लोकसभेचे मतदान संपताच उपमुख्यमंत्री पवार अडचणीत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

अजित पवार हे भाजप-शिवसेनेसोबत सत्तेत सहभागी झाल्यानंतर त्यांना अनेक प्रकरणात दिलासा मिळाल्याचे दिसून आले होते. यात ईडीच्या वतीने चौकशी सुरू असलेल्या जरंडेश्वर कारखान्याची चार्जशीट दाखल करताना त्यातून अजित पवार यांचे नाव देखील वगळण्यात आले होते. मात्र, आता लोकसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया संपल्यानंतर पुन्हा एकदा एसीबीने या प्ररकणाची चौकशी सुरू केली आहे. त्यामुळे अजित पवार यांच्या अडचणी पुन्हा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार त्यांच्याशी संबधित असलेल्या जरंडेश्वेर साखर कारखान्याची पुन्हा एकदा चौकशी सुरू करण्यात आली आहे. राज्याच्या लाचलुचपत विभागाच्या वतीने अर्थात एसीबीकडून ही चौकशी सुरू करण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे. जरंडेश्वर कारखान्याची चौकशी म्हणजे अजित पवारांसाठी हा मोठा धक्का असल्याचे मानले जाते आहे.जरंडेश्वर साखर कारखाना हा शालिनीताई पाटील या चालवत होत्या. त्यावेळी कर्जात बुडालेल्या या कारखान्याला वाचवण्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले होते. मात्र, त्यांना यश आले नाही. अखेरीस हा कारखाना लिलाव प्रक्रियेत गेला आणि हा कारखाना गुरु कमोडिटी या प्रायवेट लिमिटेड कंपनीने लिलाव प्रक्रियेतून खरेदी केला. अजित पवार यांच्याशी संबंधित व्यक्तीने हा कारखाना विकत घेतल्याची माहिती नंतर समोर आली. त्यामुळे जरंजेश्वर कारखान्याची ही लिलाव प्रक्रिया बोगस असल्याचा आरोप शालिनीताई पाटील यांनी केला होता. त्या संबंधी त्यांनी न्यायालयाद देखील दाद मागितली होती. त्यानंतर उच्च न्यायालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. तेव्हापासून या प्रकरणाची चौकशी सुरू आहे.

# महात्मा फुले विद्यालय चर्हाटा शाळेचा दहावीचा निकाल ९८ टक्के

लोकनेता न्यूज नेटवर्क । पाटोदा । प्रतिनिधी

भगवान विद्या प्रसारक मंडळ संचलित महात्मा फुले मा. विद्यालय, चर्हाटा शाळेचा निकाल ९८% लागला परीक्षेस बसलेल्या एकुण ४४ विद्यार्थी पैकी ४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. २८ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले तर १२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण तर ३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. शाळेतुन प्रथम येण्याचा मान चि.ईंदुरे वैष्णव ओमप्रकाश-९१.६०%, द्वितीय चि.वळकर ऋषीकेश अजिनाथ ९०.६०%, तृतिय तोडेकर विशाल भिमराव तसेच ईतर सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन व पुढील शिक्षणास शुभेच्छा संस्थेचे अध्यक्ष श्री.गो.गो.मिसाळ सर, संस्था उपाध्यक्ष श्री.प्रकाश आण्णा सुस्कर, संस्था सचिव श्री.डॉ. अनिलकुमारजी सानप, चर्हाटा गावचे प्रथम नागरीक सरपंच श्री.विनेशजी उबाळे तसेच शाळेचे मुख्याध्यापक/प्राचार्य माळी सर व सर्व शिक्षकवृंदानी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुण पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# किर्गीझस्तान मधुन शिवतेज राजे निंबाळकर सुखरूप भारतात

## मा.जिल्हा क्रीडा अधिकारी देशमुख मॅडम व शिवतेज यांनी मानले आ.सुरेश धस यांचे आभार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

किर्गीझस्तान मध्ये उसळलेल्या हिंसाचार दरम्यान तेथे भारतातील तब्बल १५००० तरुण अडकले होते या मध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचाही समावेश असुन या विद्यार्थ्यांना सुखरूप भारतात पोहोचण्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रयत्न करावेत अशी मागणी विधान परिषद सदस्य आमदार सुरेश आण्णा धस यांनी राज्य शासनाकडे केली होती. किर्गीझस्तान मध्ये मा. बीड जिल्हा क्रीडा अधिकारी सुहासिनी देशमुख मॅडम यांचा मुलगा शिवतेज केशव राजेनिंबाळकर हा एम.बी.बी. एस.च्या दुसऱ्या वर्षात व मुलगी धनश्री केशव राजेनिंबाळकर ही एम.बी.बी. एस.च्या चौथ्या वर्षात वेगवेगळ्या ठिकाणी शिक्षण घेत होते. मुलगा व मुलगी सुखरूप भारतात पोहचविण्यासाठी मा.जिल्हा क्रीडा अधिकारी सुहासिनी देशमुख यांनी स्वतः आमदार सुरेश धस यांची दिनांक २१/५/२०२४ रोजी आष्टीला जावुन भेट घेतली होती. आमदार सुरेश आण्णा धस यांच्या प्रयत्नाने डॉक्टर शिवतेज राजेनिंबाळकर हा दिनांक २५/५/२०२४ रोजी सायंकाळी भारतात पोहोचला असून मुलगी धनश्री केशव राजेनिंबाळकर ही ३/६/२०२४ रोजी भारतात पोहचणार आहे. शिवतेज राजेनिंबाळकर यांने भारतात पोहचल्यानंतर स्वतः आमदार सुरेश आण्णा धस यांना मोबाईल करुन आभार मानले.




तसेच शिवतेजचे आई वडील व नातेवाईक यांनी आ.धस यांचे आभार मानले आहेत. किर्गीझस्तान या देशात हिंसाचार उसळलेला होता या हिंसाचारात भारतीय विद्यार्थ्यांच्या होस्टेलवर सुद्धा हल्ले करण्यात आले. या मध्ये भारतीय तरुण विद्यार्थी भीतीच्या छायेखाली वावरत असताना त्यांनी कुटुंबांच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कडे मदतीची याचना केली होती. भारतीय विद्यार्थ्यांच्या होस्टेलमध्ये घुसून हिंसाचार करणारे अतिशय बेदम मारहाण करत होते. विमान तळावर सुध्दा शिवतेजची खुप हराशमेंट करण्यात आली. एक दिवस उपाशी रहावे लागले, परंतु देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्र मंत्रालय, राज्य सरकार व आमदार सुरेश धस यांनी प्रयत्न केल्या मुळे शिवतेज राजेनिंबाळकर सारखे अनेक तरुण भारतात सुखरूप पोहचले आहेत.

# विजे अभावी मलकापूर तालुक्यातील नागरिकांचे झाले जीवाचे रान

### थंड पाणी व डिस्चार्ज मोबाईलचा प्रश्न



गेल्या काही वर्षापासून आरोच्या थंड पाण्याची व मोबाईलच्या अंगवळणी सवयीने मनुष्य हा भौतिक सुखाच्या गुलामीत असल्याचे दिसून येत आहे. विद्युत पुरवठा खंडित असल्यामुळे थंड पाणी न मिळाल्याने मलकापूर शहरातील नागरिकांचा जीव कासावीस झाला असून तहान भागवण्यासाठी आजूबाजूच्या शहरात जाऊन आरो पाणी खरेदी केली जात आहे.तेही अव्वाच्यासव्वा भावात खरेदी करताना नागरिक दिसून येत आहे. तसेच दैनंदिन व्यवहारात मोबाईल डिस्चार्ज झाल्याने संपर्क,करमणूक व आर्थिक व्यवहार अडचणीत आले आहे

### गरमी म्हणे मी; त्यात डासांचा हैदोस;नागरिक झोपेसाठी त्रस्त!

**विजे अभावी उकळत्या गर्मीने नागरिकांच्या शरीराची लाहीलाही होत आहे. घरी व कामाच्या ठिकाणी सहन न होणारी गर्मी विजेचे महत्त्व सांगत आहे. आधीच गर्मी त्यात डासांचा थैमान यामुळे नागरिकांची रात्रीची झोप हिरावली असून अपूर्ण रात्रीची झोप पूर्ण करण्यासाठी दिवसाच्या झोपेचा बेतही गर्मीने फसवला आहे.**



### गुरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही केल्या सुटेना...

**पूर्वीचे पानवठे, नदी,नाले, धरणे, कालवे हे गुरांच्या पिण्याच्या पाण्याचे स्रोत होते.मे महिन्याच्या उत्तरार्धात बहुतांश हे पाण्याचे स्रोत आटलेले दिसून येत आहे. त्यातच विजेच्या अभावी मोटर पंपद्वारे विहीर व बोअर मधील पाण्याची उपलब्धता करणे शक्य न होत असल्याने गुरांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न काही केल्या सुटत नसून यासाठी नागरिकांची भटकंती होत असल्याचे असे चित्र आहे.**




### रुग्णांचे ही हाल बेहाल...

**विजेच्या पुरवठा खंडित झाल्या असल्याकारणाने रुग्णालयात उपचारासाठी दाखल रुग्णांचेही हाल-बेहाल होत आहेत. ज्या हॉस्पिटल यंत्रणेकडे जनरेटर व पर्यायी व्यवस्था नाही त्या ठिकाणी दाखल रुग्णांना बेड सोडून हॉस्पिटल बाहेर येऊन थांबावे लागत आहे.पेशंटच्या दृष्टीने बंद विद्युत पुरवठा जीवघेणा ठरू शकतो. शिवाय गंभीर रुग्णांच्या हितासाठी तरी विद्युत महामंडळाकडून हॉस्पिटल असणाऱ्या क्षेत्रात विद्युत पुरवठा सुरळीत करण्या साठी प्राथमिकता देणे आवश्यक आहे.**

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मलकापूर । अनिलकुमार गोठी**

२६ मे रोजीच्या सायंकाळच्या सुमारास वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाच्या हजेरीने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. थंड पाणी, डिस्चार्ज मोबाइल, रखरखत्या उन्हाने गर्मी, गुरांना पिण्याचे पाणी, रुग्णांची व्यवस्था, खाद्यपदार्थ नासाडी असे अनेक प्रश्न एकट्या विजे अभावी निर्माण झाले आहेत.भौतिक सुखाच्या सवयीने आज मानवी जीवन विळख्यात सापडल्याचे चित्र मलकापूर तालुक्यातील नागरिकांनी अनुभवल्याचे दिसून येत आहे. वादळ वाऱ्याच्या तडाख्याने गेल्या ७२ तासापासून शहरासह तालुक्यातील अनेक ठिकाणी विद्युत पुरवठा पूर्णपणे बंद असल्याने लहानापासून तर मोठ्यापर्यंत प्रत्येकजण भौतिक सुखाच्या विळख्यात असल्याचे अनुभव पहायला मिळत आहे. विज म्हणजेच भौतिक सुख, वीजे अभावी भौतिक सुख अनुभवणे अशक्य आहे. त्यामुळे या भौतिक सुखापासून मलकापूर शहरवासी पूर्णपणे दुरापास्त झाले आहे.



### व्यापारी व विक्रेते अडचणी

**दूधडेअरी,फळविक्रेते,कोल्ड्रिंक व आईस्क्रीम सेंटर, डेलीनिड्स विक्रेते यांना विजेअभावी साठवलेल्या मालाची गुणवत्ता टिकवणे शक्य होत नसून खरेदी महागड्या वस्तूंची नासाडी होत असल्याने त्यांच्या व्यापारावर गंभीर परिणाम होत असून आर्थिक तोटा सुद्धा सहन करावा लागत आहे.**

# खडकवासला कालव्याच्या पाण्यासाठी इंदापूरच्या कळस परिसरातील शेतकरी आक्रमक

## ३१ मे रोजी रास्ता रोकोचा दिला इशारा...तर भगवान खारतोडे करणार शेटफळगडे कार्यालयासमोर आत्मदहन..

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापुर । बबनराव धायतोंडे**





खडकवासला कालव्याच्या पाण्यासाठी इंदापूर तालुक्यातील कळस परिसरातील शेतकरी आक्रमक झाले असून ३१ मे रोजी रास्ता रोको करण्याचा इशारा दिला आहे. पाण्यासाठी येथील शेतकरी भगवान खारतोडे शेटफळगडे कार्यालयासमोर आत्मदहन करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

खडकवासला कालव्याच्या पाण्यासाठी इंदापूरच्या कळस परिसरातील शेतकरी आक्रमक झालेत.३० मे पर्यंत कालव्याला पाणी न सोडल्यास भगवान खारतोडे यांनी ३१ मे रोजी खडकवासला प्रकल्प सिंचन व्यवस्थापनाच्या शेटफळगडे शाखेसमोर आत्मदहनाचा इशारा दिला आहे.


कालव्याच्या पाण्या संदर्भात कळस मध्ये शेतक-यांची बैठक पार पडली. यात इंदापूर तालुक्याला पिण्यासाठी खडकवासला कालव्याचे पाणी दि.३० मे पर्यंत न सोडल्यास दि.३१ मे रोजी पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्ग डाळज नं.२ या ठिकाणी अडवण्याचा इशारा देण्यात आला आहे. इंदापूर तालुक्याला खडकवासला कॅनल मधून साडेतीन टीएमसी पाण्याची तरतूद आहे.परंतु आजपर्यंत आम्हाला एवढे पाणी कधीच मिळाले नसल्याचा या शेतकऱ्यांचा आरोप आहे. इंदापूर तालुक्यात एकूण भिजावू लाभक्षेत्र १८ हजार हेक्टर इतक आहे. परंतु १७०० हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्र कधीच भिजलं नाही.असाही या शेतकऱ्यांनी आरोप केला आहे.कालवा सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये इंदापूर तालुक्याला कालव्याव्दारे दोन उन्हाळी आवर्तने देण्याचे ठरले असताना आता दुसरे आवर्तन मिळण्याची चिन्हे दिसत नाहीत, असा अंदाज या शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. यासोबतच पुण्याच्या पिण्याच्या पाण्याच्या नावाखाली आमच्यावर अन्याय होत असल्याचंही या शेतकऱ्यांचे मत आहे. सध्या या कालव्याद्वारे दौंडच्या हद्दीत पाणी असून इंदापूरला मात्र पाणी नाही.इंदापूर तालुक्यातील शेटफळगडे, निरगुडे, पोंधवडी, अकोले,वायसेवाडी, कळस,पिलेवाडी, गोसावीवाडी,रुई, मराडेवाडी,न्हावी,बळपुडी,लोणी देवकर,व्याहळी, कौठळी,पोंधकुलवाडी परिसरात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. याशिवाय जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे तात्काळ प्रशासनाने खडकवासला कालव्याद्वारे पिण्यासाठी आणि जनावरांसाठी पाणी सोडावं अशी मागणी करण्यात आली आहे.

# उन्हाळी सुट्टीत पारंपारिक खेळांपासून चिमुकले कोसोदूर

## मोबाईल संगणक,टि.व्ही पायी चिमुकले झाले एकलकोंडे..!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



मेरा देश बदल रहा है..! असं जर कोणी म्हणत असेल तर ते चुकीचे ठरतेय असं वाटत नाही. कारण की सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात बहुतांश पारंपरिक गोष्टींना खीळ बसत असून रोज नवनवीन बाबी पाहायला दिसताहेत आणि हाताळायला पण मिळत आहेत. याचं ज्वलंत उदाहरण म्हणजे मोबाईल, संगणकाच्या,टि.व्ही युगात उन्हाळी सुट्टीतील पारंपरिक खेळांपासून चिमुकले सुद्धा कोसोदूर जात असून एकांतातले खेळ खेळत एकलकोंडे होताना दिसून येत आहेत.

शालेय शैक्षणिक जीवनांतील मुलांना वर्षभर शाळा करता करता कधी एकदाची उन्हाळ्याची सुट्टी लागेल आणि आपण कधी मामाच्या गावांकडे जाऊ व मौज-मस्ती करू असे लहान मुलांपासून ते दहावी , बारावीपर्यंतच्या शालेय मुलांना याची उत्सुकताही लागलेली असायची. उन्हाळी सुट्टी म्हणजे पूर्वीच्या काळी एक वेगळाच आनंद असायचा. सुट्टी लागली की कधी एकदाच आपल्या मामांच्या गावाला जावं अशी परिस्थिती लहान मुलांची असायची. आता मात्र या आधुनिक युगामध्ये संगणक , मोबाईल मुळे मुलांना मामाच्या गावचा व पारंपरिक खेळांचा विसर पडला आहे.

उन्हाळी सुट्टीत एकदा का मामाच्या गावाला गेले म्हटले की सुट्टीत विहिरीमध्ये पोहण्याचा आनंद तसेच इतर वेगवेगळे पारंपारिक खेळ खेळण्याची मजा वेगळीच असायची. मग ते गोट्या खेळणे, गील्ली-दांडू खेळणे, लपंडाव खेळणे, चंफुल, खडे,त्याचबरोबर कबड्डी, क्रिकेट, खो-खो असे मैदानी खेळाचा आनंद मुले सुट्टीत घ्यायची.पारंपरिक खेळ खेळण्यात एक वेगळाच आनंद असायचा. या पारंपरिक मैदानी खेळामुळे लहान मुलांच्या शारीरिक स्वास्थ्यावर सुद्धा त्याचा चांगलाच परिणाम दिसून यायचा ते शरीर परिपक्व बनून आजारी पडण्याचे प्रमाण कमी असत. सध्याची परिस्थिती बद्दली आहे. सुट्टीतील खेळांची जागा आता मोबाईल , टीव्ही , संगणकाने घेतली आहे. त्यामुळे लहान मुलापासून अगदी मोठे मुले सुद्धा मामाचे गाव तसेच पारंपारिक खेळ सुद्धा पूर्णपणे विसरून गेले आहेत.

इंटरनेटच्या युगामध्ये प्रत्येक पालकाला आपला मुलगा अभ्यासामध्ये इतर मुलांपेक्षा वेगळा उठून दिसला पाहिजे या अट्टाहासापोटी मूले अक्षरशः शाळेच्या अभ्यासाच्या नावाखाली मोबाईल मध्ये तल्लीन होऊन गेली आहेत. यामुळे उन्हाळ्याच्या सुट्टीचा खराखुरा आनंद असेल किंवा पूर्वीच्या काळी खेळले जाणारे पारंपारिक खेळही सध्याच्या काळात दुरापस्त झाले आहेत. मोबाईल,सोशल मीडियाचा वापर तरुणाईला अतिशय घातक ठरतोय. पण मोबाईल व सोशल मीडियामुळे उन्हाळ्याची सुट्टी, पारंपरिक खेळ व मामाचे गावही विसरून गेली आहेत.

# मुख्य कार्यकारी अधिकारी यांची गागलेगाव येथे विकासकामांची पाहणी





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

नांदेड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करनवाल यांनी बिलोली तालुक्यातील दिनांक २८ मे रोजी गागलेगाव येथील आरोग्य उपकेंद्र व तलावातील गाळ काढणे चालू असलेल्या ठिकाणी व इतर कामाची भेट देऊन विकासकामांची पाहणी केली. ग्रामपंचायतमार्फत सुरु असलेल्या कामांची माहिती घेत ग्रामपंचायतीस विकासकामांबाबत आवश्यक सूचना केल्या. भेटीदरम्यान कामाची पाहणी केली. जलजीवन मिशनअंतर्गत सुरु असलेल्या कामांचीदेखील माहिती त्यांनी घेतली. विकासकामांचा आढावा घेत विकासकामांबाबत सूचना केल्या. गागलेगाव ग्रामपंचायतीच्या कामाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. भेटीप्रसंगी पंचायत समिती बिलोली गटविकास अधिकारी पदमावार साहेब , पाणीपुरवठा इंजिनिअर चव्हाण साहेब, , विस्तार अधिकारी उडतेवार साहेब, सरपंच उषाताई आनंदराव जिंके, ग्रामसेवक श्रीपाद जाधव, उपसरपंच सरवर शेख, ग्रामपंचायत सदस्य पिराजी कमळे , माजी ग्रामपंचायत सदस्य कोंडिबा जिंके ग्रामपंचायत सेवक रज्जबल्ली शेख , व ग्रामस्थ उपस्थित होते.

# सहकार विद्या मंदिर सिंदखेड राजा विद्यालयाची १००% उज्वल यशाची परंपरा कायम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत)**




सहकार विद्या मंदिर सिंदखेड राजा या विद्यालयाने वर्ग दहावी शालांत परीक्षेमध्य कायमच नेत्रदीपक कामगिरी केलेली आहे याही वर्षी शैक्षणिक सत्र २०२३ २०२४ मध्य १००% टक्के यश संपादन करुन ही परंपरा कायम ठेवली आहे.या मध्य एकुण ६६ विद्यार्थी परिक्षेमध्य बसलेले होते .त्यापैकी ३१ प्राविण्य श्रेणी मधे,३३ प्रथम श्रेणी मध्य,तर ०२द्वितीय श्रेणी मध्य उत्तीर्ण झालेले आहे यामध्य, प्रथम कु आरती गंगाधर ठाकरे ९४.२०% व श्रद्धा अनिल वाघ ९४.२०% टक्के घेवून प्रथम यश व्यंकटेश खरात ९४.२०% घेवुन द्वितीय तर कु प्रियंका सदानंद वाघमारे ९३.६०% घेवून तृतीय क्रमांक प्राप्त केलेला आहे.या सर्व गुणवंताचे अभिनंदन व कौतुक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा श्री राधेशामजी चांडक , चेरिटेबल अध्यक्षा मा सौ कोमलताई झंवर,सीएमडी श्री सुकेंशजी झंवर, आ सौ नम्रता पाटिल मैडम ,श्री वाणी सर , शालेचे मुख्याधापक डॉक्टर श्री दिनेश इंगले सर , शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यानी केले तसेच पुढ़िल शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# परळी न्यू हायस्कूल मध्ये दहावी बोर्ड परीक्षेत कु.अनन्या सदानंद क्षीरसागर हिचे घवघवीत यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**



शैक्षणिक वर्ष २०२३-२४ एस एस सी बोर्डाकडून घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत परळीच्या न्यू हायस्कूल मध्ये शिकत असलेली कु अनन्या सदानंद क्षिरसागर हिने ९७.२०% गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले.अगदी लहानपणापासून अभ्यासामध्ये हुशार असलेली अनन्या क्षीरसागर हिने परमेश्वराने दीड वर्षांपूर्वी वडिलांची छत्रछाया हिरावून घेतल्यानंतरही अभ्यासामधील आपली कर्तबगारी कायम ठेवली. अनन्यास अभ्यासामध्ये तिची आत्या बहीण डॉक्टर प्रगती चौधरी हिचे वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन लाभले त्याचबरोबर काका संजय क्षीरसागर, काकू सौ सुरेखा क्षीरसागर व आई श्रीमती दीपा क्षीरसागर यांनी देखील अभ्यासामध्ये तिच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहून कोणत्याच गोष्टीची कमतरता भास होऊ दिली नाही. अनन्यास १००% गुण मिळतील अशी खात्री होती मात्र ९७.२० टक्यावरच तिला समाधान मानावे लागले. अनन्यास पुढे नीट ची तयारी करून पुढे तिला डॉक्टर व्हायचे आहे. आपल्या यशाचे श्रेय अनन्या आपले शिक्षक शहापूरे सर, शास्त्री सर व सुरवसे सर यांना देते. एसएससी शालांत परीक्षेत मिळालेल्या मोठ्या यशाबद्दल अनन्या क्षीरसागर हिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून अनेकांनी तिला भावी शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाची मुंबई विभागीय बैठक नेरे येथील शांतीवन येथे मोठ्या उत्साहात पार पडली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाची व अन्याय अत्याचार निवारण समितीची मुंबई विभागीय आढावा बैठक नेरे येथील शांतीवन कुष्ठरोग निवारण समितीच्या धर्माधिकारी सभागृहांमध्ये मोठ्या उत्साहात दिनांक २६/०५/२०२४ रोजी पार पडली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुरोगामी पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विजयजी सूर्यवंशी होते या कार्यक्रमाला पाहुणे म्हणून शांतीवन कुष्ठरोग निवारण समितीचे कार्यवाहक श्री विनायक शिंदे,संघाचे विश्वस्त श्री झुंबरसिंग पाटील,अन्याय अत्याचार निवारण समितीच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष दीपा अग्रवाल,अन्य अत्याचार निवारण समितीच्या महाराष्ट्र राज्य संघटक सुरेखा गांगुर्डे,यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच बैठकीच्या सुरुवातीला शांतीवन मधील कार्यकर्ते संतोष ढोरे यांनी कुष्ठरोग निवारण समिती शांतीवनच्या स्थापनेपासून तर आज पर्यंतची संपूर्ण माहिती उपस्थितीतांना सांगितले .यावेळी संघाच्या आतापर्यंतच्या वाटचालीबद्दल व संघ वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी काय करता येईल याचा आढावा घेण्यात आला याप्रसंगी बोलताना झुंबर सिंग पाटील यांनी सर्वांना सांगितले की सर्वांनी मिळून मिसळून काम करून संघाला पुढे न्यावे.अन्याय अत्याचार निवारण समितीच्या महाराष्ट्र उपाध्यक्ष दीपा अग्रवाल यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की प्रत्येक पदाधिकाऱ्यांनी व प्रतिनिधींनी जर एक तरी प्रतिनिधी जोडला तर संघ कुठल्या कुठे पोहोचेल. अध्यक्षीय भाषणात श्री विजयजी सूर्यवंशी यांनी संघ वाढीसाठी काही महत्त्वाच्या सूचना सर्व पदाधिकाऱ्यांना केल्या त्यामध्ये गाव तेथे शाखा हा महत्वाचा उद्देश सर्वांना पटवून सांगितले तसेच काही प्रमाणिक पदाधिकाऱ्यांचा अजीवन सभासदांमध्ये समावेश करून संघाला बळकटी येईल असे आवाहन केले यामध्ये रायगड जिल्हा अध्यक्ष धनाजी पुदाले, रायगड जिल्हा सचिव राजपाल शेगोकार व रायगड सहसचिव दत्तू ठोके यांना अजीवन सभासत्व बहाल केले,तसेच संघातील इतर पदाधिकाऱ्याला आव्हान केले की जे आहेत त्याच्यासोबत आणि जे नाही त्याच्याशिवाय आपली संघटना बळकट करायचे आहे, तरी सर्वांनी मेहनत घेऊन संघ बळकट करावा.सोडून गेले ते कावळे सोबत आहे ते मावळे असे समजून सरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. संघाची काही पदाधिकारी सतत मिटींगला गैरहजर असतात त्यांना अध्यक्षांनी मीटिंगच्या माध्यमातून सांगितले की संघाच्या नियमावलीनुसार जो पदाधिकारी किंवा प्रतिनिधी सलग तीन मिटींगला गैरहजर राहील त्याला संघटनेत स्वारस्य किंवा इच्छा नाही अशी समजून त्याला संघातून निलंबित करण्यात येईल,तरी सर्वांनी या नियमावलीचे पालन करावे व तीन पैकी कमीत कमी दोन मीटिंग हजर राहावे असे आवाहन केले. या कार्यक्रमाची प्रस्तावना रायगड जिल्हाध्यक्ष धनाजी पुदाले यांनी केले.व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन गायकवाड रायगड जिल्हा संपर्कप्रमुख यांनी केले. या कार्यक्रमाला आवर्जून रायगड जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व ठाणे जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते खालील प्रमाणे उपस्थित होते.प्रशांत भोईर,नितीन जाधव, उज्वला पाटील,प्रल्हाद पाटील, बाळाराम सावंत अमोल पाटील, उमाजी मंडले,वर्षा मस्कर, जयश्री हुमणे,अनिता ठक्कर, भावीक ठक्कर, गणेश पराड, मंगेश खुटले,एकनाथ जाधव, प्रीतम सिंग चव्हाण मच्छिंद्र पाटील जगदीश क्षीरसागर आदी उपस्थित होते.या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत गाऊन करण्यात आली.

# मलकापूर तालुक्यात वादळी वाऱ्यामुळे कहरच कहर ;झाडे,घरांची पडझड ; वाहनांचेही नुकसान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मलकापूर । अनिलकुमार गोठी**

शहरात दिनांक २७ मे रोजी अचानक ६.३० वाजता वादळी वारा व विजांच्या गडगडात पावसाने रौद्ररूप धारण केले होते.अवघ्या पाऊण तासात अनेकांच्या घरांची तीनपत्रे, झाडे रस्त्यावरील टिनटपऱ्या, दुचाकी, चारचाकी, सोलर किट, यांची नासधुस झाल्याची महाभयंकर अशी घटना शहर वासियानी अनुभवली. दिवसभर कडाक्याचे ऊन अन अचानक सायंकाळच्या सुमारास वादळी वारा व विजांच्या गडगडातसह पावसाने हजेरी लावली. पहिल्या पावसाचे हे रौद्ररूप एवढे महाभयंकर होते की क्षणात रस्ते निर्मनुष्य झाले होते.प्रत्येक जीव मिळेल तिथे आडोसा घेत होता. दुकान धारकांनी तर  चक्क दुकानांचे शटर बंद करून दुकानाच्या आज जीव मुठीत घेऊन बसले होते.या वादळी वाऱ्याने टीनपत्रे, झाडांच्या फांद्या, सोलर किट, पतंगाप्रमाणे हवेत उडताना शहरवासीयांनी अनुभवले. या कहराने प्रत्येकाच्या मनात भीती निर्माण केली होती. प्रशासन मदत कार्यासाठी सक्रिय असल्याचेही दिसून आले.



### शहरात अनेक ठिकाणी चक्का जाम

रस्त्याच्या दुतर्फा असलेली जिवंत झाडे कोलमडून रस्त्यावर कोसळल्याने मलकापूर ते दाताळा , कारंजा चौक ते मुधडा पेट्रोल पंप या सह शहरातील अनेक मुख्य रस्त्यांवर चक्काजाम झाला होता वाहनधारकांना तब्बल दोन ते तीन तास रस्त्यावर अटकून राहावे लागले होते काही ठिकाणी तर शेतातील टीनपत्रे रस्त्यावर येऊन पडलेली होती. प्रशासन झाडांना हटवण्यासाठी सक्रिय असल्याचे दिसून आले.

### मलकापूर आगाराच्या बसवर वीज कोसळली

मलकापूर आगाराची बस क्रमांक एम.एच.–०७– सी– ९२१७ ही अकोल्याकडून मलकापूर कडे येत असताना आयटीआय कॉलेज जवळ बसवर वीज कोसळून बस वरील पत्रा फाटला व बसच्या काचा फुटल्या या घटनेत महिला कंडक्टर जखमी झाली असून सुदैवाने प्रवाशांना दुखापत झाली नाही.

### वादळ वाऱ्याचा तांडव ;काही ठिकाणी पडझड तर काही ठिकाणी नासधूस

अचानक वादळ वाऱ्याच्या ह्या तांडवात काहींच्या घरावरील टीनपत्रे उडाली तर जिवंत झाडे उलमडून रस्त्यावर कोसळली, रस्त्यावरील टिनटपऱ्या चेंडू प्रमाणे उडाल्या, काहींच्या घरावरील सोलर किट या सुद्धा हवेत उसळताना दिसून आल्या, रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या दुचाकी व चार चाकी वर झाडांच्या फांद्या पडून चुराडा झाल्याचेही चित्र होते. इतकेच नव्हे तर विद्युत वाहिन्या तुटून पडल्या होत्या व झाडे जमीनदोस्त झाले होते. विशेष म्हणजे मलकापूर शहर पोलीस स्टेशनचे टीनपत्रे सुद्धा उडाली तसेच दाताळा व दसरखेड येथील टोल नाक्यावरील टीनपत्रे सुद्धा उडाल्याची घटना घडली आहे.


### वादळ वाऱ्याच्या तांडवाने घेतला एकाचा बळी

शहरातील भीम नगर परिसरात असलेले महादेव मंदिर येथे एक इसम वादळ वाऱ्याच्या संकटातून बचावासाठी आडोसा घेत मंदिरात उभा असताना भिंत कोसळल्याने त्याच्या डोक्याला जबर मार बसून जागीच मृत्यू झाला आहे.

### मलकापूर अंधारात

अवकाळी पावसाच्या महाभयंकर अशा तांडवाने झाडांसह विद्युत खांबे सुद्धा कोलमडली अनेक विद्युत वाहिन्या तुटल्या यामुळे मलकापूर शहर अंधारमय झाले आहे.

## मलकापूर तहसीलदाराणी झालेल्या नुकसानाची पाहणी केली



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मलकापूर । अनिलकुमार गोठी**

२६ मे रविवार रोजी संध्याकाळी झालेल्या आकस्मित चक्रीवादळ प्रचंड हवेमुळे,व अचानक झालेल्या पावसामुळे अनुराबाद तसेच परीसरात ता मलकापूर येथे झालेले नुकसानीचे सर्वे करून नुकसान भरपाई शासनाकडून पंचनामा करून लवकरात लवकर मिळावी या उद्देशाने तहसीलदार यानी केली पाहाणी केली

दि २६ मे रविवार रोजी संध्याकाळी अनुराबाद तसेच परिसरात अचानक चक्रीवादळ आले व प्रचंड वाऱ्याच्या वेगासह पाऊस पडला त्यामुळे अनुराबाद येथील नागरिक व शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात अनुराबाद गावात, शेतात अतोनात नुकसान झाले, अनुराबाद गावामध्ये भरपूर घरांची पडझड झाली,घरावरचे गोठ्यावर चे टिनपत्रे ऊडून गेली, असंख्य झाडे पडली, असंख्य विद्युत पोल वाकुन मोठ्या प्रमाणात विद्युत तारा तुटल्या, शेतातील साहित्य  नष्ट झाले, घरातील धान्य, जीवनावश्यक सामान, शेतातील पिकधान्य,  जनावरांचा चारा कुटटी यांचे अतोनात नुकसान आहे या सर्व बाबतीत तलाठी,मंडळ अधिकारी,ग्रामसेवक  क्रुषी सहायक यांच्याकडून त्वरित सर्व नुकसानीचा ताबडतोब सर्वे करुन नुकसानग्रस्त यांना नुकसान भरपाई देण्यात यावी ही मागणी गावकऱ्यांनी केली.

## धामणगावचे मंडळाधिकारी मोहदय नेमकं असतात तरी कोठे? कार्यालय असुन आडचण,नसुन खोळंबा

### मंडळाधिकाऱ्याला सज्जाचे वावडे तालुक्यावरून हाकतात कारभार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

आष्टी तालुक्यातील प्रत्येक सज्जा च्या ठिकाणी महसुल विभागाने सर्व सामान्य जनतेची व शेतकऱ्याची कामे सज्जाच्या ठिकाणी व्हावेत यासाठी तलाठी व मंडळाधिकारी याच्यासाठी लाखो रुपये खर्च करून कार्यालय आणि निवासस्थान बांधले असले तरी देखील या ठिकाणी कामकाज करण्यास मात्र तलाठी व मंडळाधिकारी यांना रस वाटत नसल्याने हे कार्यालय धुळखात पडल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे.

आष्टी तालुक्यातील धामणगाव सज्जाच्या अंतर्गत धामणगावसह महाजनवाडी, लाटेवाडी,बिरंगळवाडी, हाकेवाडी, वंजारवाडी, बोराडवाडी, राळसांगवी व इतर गांवांचे कामकाज चालते.या परिसरातील सर्वसामान्य नागरिक व शेतकरी यांना महसुल मंडळाचे कामे मंडळातच व्हावेत यासाठी लाखो रुपये खर्च करून बांधले परंतु बांधलेल्या इमारतीत मात्र तलाठी व मंडळाधिकारी यांनी आजुन कामकाजाला मुहूर्त सापडत नसल्याने  या सज्जाचे भाऊसाहेब (तलाठी) मंडळाधिकारी केव्हा येतात, केव्हा जातात,त्यांचे कोणत्या कार्यालयातुन कामकाज चालते, कार्यालय कोठे आहे.याची कोणतीच माहिती जनतेला नाही. त्यामुळे शेतकरी वर्गाला पदरमोड करुन सोयीच्या ठिकाणी जाऊन मंडळाधिकारी यांच्याकडुन आपली कामे करून घेताना नाहक त्रास होत आहे.तलाठी व मंडळाधिकारी यांनी मुख्यालयी थांबुन जनतेला लागणारी विविध प्रमानपत्रे, पंचनामे, निराधार, विधवा,जेष्ठ नागरीकांना लागणारे दाखले, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी लागणारे कागदपत्रे यासह विविध काम करणे बंधनकारक आहे. धामणगांव मंडळाधिकारी यांचे कार्यालय कायमस्वरुपी बंद असल्याने दुष्काळी परिस्थितीत आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना,नागरिकांना व विद्यार्थ्यांना नाहक आर्थिक भुर्दंड बसत आहे. मग महसुल विभागाने लाखो रुपये खर्च करून बांधलेल्या हे कार्यालय कशासाठी अशा प्रश्न जनतेतून विचारला जात आहे. तर कार्यालय इमारत असुनही त्यात कामकाज  करण्यास टाळाटाळ करणाऱ्या मंडळाधिकारी यांच्यावर तहसीलदार कारवाई करणार का ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



# आई–वडिलांच्या कष्टाचे मोल लक्षात ठेवून भविष्यात यशाची शिखरे पादाक्रांत करा–आमदार सुरेश धस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**





डिजिटल युगात मोबाइलचे जसे चांगले फायदे आहेत, तसेच तोटे देखील आता समोर येऊ लागले आहेत. दीड–दोन वर्षाच्या चिमुकल्याच्या हाती देखील आता मोबाईल दिसू लागला आहे. घरातील कामे करीत असताना मुलगा चिडचिड करू नये म्हणून आईच त्याच्या हाती मोबाईल देऊ लागली.मोबाईलच्या अती वापरामुळे कुटुंबातील संवाद आता बंद झाल्याचे विदारक चित्र दिसत आहे.त्यामुळे पालकांनी आता सजगता दाखवणे गरजेचे आहे.कळत्या वयात विद्यार्थांनी देखील मोबाईलचा अती वापर टाळला पाहिजे आणि दहावी बारावी मध्ये जशी गुणांकन मिळवली त्यात सातत्य ठेऊन भविष्याची वाटचाल विद्यार्थांनी करावी तुम्ही कुठल्याही क्षेत्रात जा तिथे आपली गुणवत्ता सिद्ध करा उच्चपदस्थ झाल्यावर मी स्वतः तुमचा सत्कार करायला जिथे असाल तिथे येईल असे प्रतिपादन आ.सुरेश धस यांनी केले.यावेळी व्यासपीठावर गटविस्तार अधिकारी मनोरंजन धस,विवेकानंद पतसंस्थेचे अध्यक्ष मारुती पठाडे, सुरेश पवार,हिराशेठ बलदोटा उपस्थित होते.
आष्टी शहर तसेच परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.
पुढे बोलताना आ.धस म्हणाले की,आई वडील काबाडकष्ट करून मुलांच्या भविष्यासाठी हाडाची काड करत असतात. मुलांना जे पाहिजे ते तात्काळ उपलब्ध करून देतात मात्र त्यांच्या कष्टाची जाणीव ठेवणाऱ्या वर्गाची संख्या आता दिवसेंदिवस कमी होत चालली असून.विद्यार्थी मोबाईलच्या अती वापरामुळे दिशाहीन होत असल्याचे विदारक चित्र समाजात दिसत आहे.फेसबुक, व्हॉट्सअँप, इंस्टाग्राम,स्नॅप यामुळे विद्यार्थी नको द्या दिशेला जात आहेत.आपण एक गोष्ट लक्षात घ्या जे आशियायी खेळाडू आहेत,ऑलिंपिक पदक विजेते आहेत,ज्यांना प्रामाणिकपणे काही तरी करण्याची इच्छा आहे असे विद्यार्थी मोबाईलचा वापर अगदी नगण्य करतात.त्यामुळे त्यांचे एकचित्त राहते आणि अभ्यासात सातत्य ठेवण्याचे काम त्यांच्याकडून होत असते.म्हणून पालकांनी देखील घरी गेल्यावर मुलांशी संवाद ठेवणे गरजेचे आहे.आणि मुलांनी देखील निवडक क्षेत्रात न जाता आपण जगाच्या पाठीवर अनेक शिक्षणाच्या माध्यमातून वेगवेगळे कोर्सेस आहेत त्यात प्रयत्न करा आणि आपले आपल्या गावाचे आणि देशाचे नाव रोशन करा.असेही शेवटी आ.धस म्हणाले.या कार्यक्रमात आष्टी शहरासह परिसरातील शंभरहून अधिक विद्यार्थी तसेच त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिराशेठ बलदोटा सूत्रसंचलन सतीश दळवी तर आभार सचिन रानडे यांनी मानले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904